परीक्षा विभाग/कला कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ(पू),
मुंबई ४०० ०९८.

क. परीक्षा/निकाल/३४-A/२०१८

**परिपत्रक :-**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/ विद्यापीठ संचालीत असलेल्या सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि-संचालक व विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक क्र. परीक्षा/निकाल/३४-A/२०१७, दि. १५डिसेंबर, २०१७ अन्वये प्रथम सत्र, २०१८ मध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठीचे पारंपारिक पध्द्ती प्रमाणे Hard copy (ऑफलाइन) स्वरूपात घेण्यात येणारे परीक्षा अर्ज स्वीकारण्याच्या तारखांचा तपशील कळविण्यात आला होता.

तरी, विद्यापीठाने परिपत्रक क्र. Exam./Fees/15/2018, दि. ३१ जानेवारी २०१८ च्या अन्वये दिलेल्या निर्देशानुसार परीक्षा शुल्कामध्ये केलेल्या सुधारणानुसार परीक्षांचे अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत वाढविण्यात आली असून त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे:-

| परीक्षा शुल्क | महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून अर्ज स्वीकारण्याच्या तारखांचा | महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले अर्ज व परीक्षा शुल्क (सुधारीत शुल्क) विद्यापीठाकडे जमा करण्याची तारीख |
|---|---|---|
| विलंब शुल्क रू. ५००/- | दि. ०१/०३/२०१८ ते १५/०३/२०१८ | दि. १७/०३/२०१८ पर्यंत |

उपरोक्त तारखांचा तपशील फक्त पारंपारिक पध्द्ती प्रमाणे Hard copy (ऑफलाइन) स्वरूपात स्वीकारण्यात येणाऱ्या अर्जांसाठीच लागू आहे. ज्या परीक्षांचे अर्ज MKCL व विद्यापीठाच्या C.C.F. विभागाकडून Online पध्दतीने स्वीकारण्यात येतील त्यासाठी लागू नाही.

तरी आपणांस विनंती करण्यात येते उपरोक्त तपशीलाप्रमाणे परीक्षा अर्ज स्वीकारून सुधारीत विहीत शुल्कासह उपरोक्त नमुद तारखांपर्यंत विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे हस्ते पोच जमा करावेत. पोस्टाने/ कुरिअरने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद द्यावी.

**स्थळ : मुंबई.**
**दि. 01 मार्च, 2018**

प्रभारी संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत:-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालीत असलेल्या सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थेचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि-संचालक व विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीसाठी :-

१. संचालक, संगणक सुविधा केंद्र, परीक्षा विभाग
२. उपकुलसचिव, वित्त व लेखा विभाग, परीक्षा भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ, मुंबई- ४०० ०९८
३. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग
४. मा. कुलगुरू व कुलसचिव यांचे स्वीय सहायक